नवी मुंबई महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा दि.२१.०९.२०१६ रोजी पारित करण्यात आलेला ठराव क्र.१२२६, मधील उपसूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) अन्वये अंतिमत: विखंडित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- नमुंम-१२१८/प्र.क्र.१२/नवि-२८
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ११ जुलै, २०१९

संदर्भ:- १) शासन निर्णय समक्रमांक, दि.०४.०२.२०१९.
२) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांचे दि.२८.०२.२०१९ चे अभिवेदन.
३) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.नमुंमपा/जसं-३/१८५/२०१९, दि.२०.०३.२०१९.

प्रस्तावना:-

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरी सुविधा प्रकल्प व लोकापयोगी कामांचे उद्घाटन, भुमिपूजन, शुभारंभ, लोकार्पण समारंभ इत्यादी विविध समारंभ आयोजनाबाबतचा नवी मुंबई महानगरपालिकेच्या महासभेने पारीत केलेला दि.२१.०९.२०१६ रोजीचा ठराव क्र.१२२६ मधील उपसूचना व्यापक लोकहिताच्या विरुद्ध असल्याने, शासनास असलेल्या अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ (१) मधील तरतुदीनुसार संदर्भिय दि.०४.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये निलंबित करण्यात आली. तसेच संबंधितांना याबाबत अभिवेदन करण्यास सुचित करण्यात आले.

२. त्याअनुषंगाने महापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांनी संदर्भिय दि.२८.०२.२०१९ च्या पत्रान्वये त्यांचे अभिवेदन सादर केले, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, महापौर व आयुक्त यांच्याऐवजी फक्त महापौराच्या मार्गदर्शनानुसार निमंत्रण पत्रिकेचा मसुदा महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामार्फत करण्यात आल्यास कोणत्याही पक्षाच्या नेत्याचा यथोचित सन्मान महापौरांना करता येईल. त्याचप्रमाणे महापौर या नात्याने निमंत्रण पत्रिका काढताना राजशिष्टाचाराचे कुठेही अवमुल्यन होणार नाही याची दक्षता महापौरांकडून घेण्यात येईल. यास्तव महानगरपालिकेच्या उक्त ठरावाच्या उपसूचनेबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती केली आहे.

३. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी महापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या उक्त अभिवेदनावर संदर्भाधीन दि.२०.०३.२०१९ च्या पत्रान्वये नवी मुंबई महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा दि.२१.०९.२०१६ रोजी पारित केलेला ठराव क्र.१२२६ मधील उपसूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ (३) नुसार विखंडीत करण्याचे अभिप्राय शासनास सादर केले आहेत.

४. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका हे महानगरपालिकेचे कार्यकारी प्रमुख असल्याने राजशिष्टाचाराबाबत काही वाद उद्भवल्यास अथवा विधानमंडळात हक्कभंग झाल्यास त्यांना साक्ष देणे भाग पडते. तसेच राजशिष्टाचाराचे योग्य अनुपालन होण्याच्या दृष्टीने निमंत्रण पत्रिकेचा मसूदा महापौर तसेच आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे मार्गदर्शनाखाली होणे आवश्यक असल्याने महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२२६, दि.२१.०९.२०१६ मधील उपसूचनेची अंमलबजावणी करणे उचित असल्याचे दिसून येत नाही.

सबब, संदर्भाधीन दि.०४.०२.२०१९ च्या शासन निर्णयाद्वारे निलंबित केलेली उपसूचना व्यापक लोकहिताच्या विरुद्ध असल्याने अंतिमत: विखंडीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय दि.०४.०२.२०१९ अन्वये नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दि.२१.०९.२०१६ रोजी मंजूर केलेल्या ठराव क्र.१२२६ मधील निलंबित केलेली "नवी मुंबई महानगरपालिका विविध समारंभ आयोजनाबाबत प्रचलित नियमावलीतील बाब क्र.१ ते ४ यापैकी बाब क्र.२ ते ४ मध्ये प्रस्तावित केल्यानुसार महापौर व आयुक्त या ऐवजी महापौर यांचे मार्गदर्शनानुसार निमंत्रण पत्रिका मसूदा जनसंपर्क विभागामार्फत तयार करण्यात यावा." ही उपसूचना व्यापक लोकहिताविरुद्ध असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम-४५१ (३) अन्वये अंतिमत: विखंडीत करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०७१११४५८४३००२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.07.15 17:43:39 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महापौर, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
३) आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवडनस्ती (नवि-२८).